# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar
# Date – 11 August 2024
# Time 18.10 to 18.20
# Language Marathi
# आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर
# प्रादेशिक बातम्या
# दिनांक – ११ ऑगस्ट २०२४ सायंकाळी ६.१०

****

- सुपीक, हवामानाला अनुकूल आणि जैव संवर्धन करणाऱ्या ६५ पिकांच्या १०९ वाणांचं पंतप्रधानांच्या हस्ते वाटप.
- मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा राज्यस्तरीय कार्यक्रम १७ ऑगस्टला पुण्यात होणार.
- मागील वर्षीच्या सोयाबीन आणि कापूस उत्पादक शेतकऱ्यांना दोन हेक्टर पर्यंत मदत देण्याचा राज्य सरकारचा निर्णय.

आणि

- पॅरिस ऑलिम्पिक स्पर्धेचा आज समारोप, भारतातर्फे हॉकीपटू पी. आर. श्रीजेश आणि नेमबाज मनु भाकर यांना ध्वजवाहक होण्याचा मान.

****

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज नवी दिल्लीत अत्यंत सुपीक, हवामानाला अनुकूल आणि जैव संवर्धन करणाऱ्या ६५ पिकांच्या १०९ वाणांचं वाटप केलं. यात भरडधान्य, तेलबिया, कडधान्य, ऊस, कपाशी, तृणधान्य यांसह भाज्या, फळं, कंदमुळं, मसाले, औषधी वनस्पती, फुलं अशा विविध पिकांचा समावेश आहे. यावेळी पंतप्रधानांनी शेतकरी आणि शास्त्रज्ञांशी संवाद साधला. या वाणांमुळे शेती उत्पादनाचा खर्च कमी होऊन पर्यावरणावर सकारात्मक परिणाम होणार असल्याचं पंतप्रधानांनी सांगितलं. नैसर्गिक शेतीबाबत जनजागृती वाढवण्यासाठी तसंच शेतकऱ्यांना नवीन वाणांची माहिती देण्यासाठी कृषी विज्ञान केंद्रांनी सक्रिय भूमिका बजावली पाहिजे, असं पंतप्रधान यावेळी म्हणाले. लोक आता पोषक आहारावर भर देत असल्याचं सांगून भरड धान्याचं महत्त्व त्यांनी अधोरेखित केलं.

ही नवी वाणं खर्च कमी करणारी, तसंच पर्यावरणस्नेही असल्यानं अतिशय फायद्याची असल्याचं मत, केंद्रीय कृषीमंत्री शिवराज सिंह चौहान यांनी यावेळी व्यक्त केलं. शेतकऱ्यांनीही सेंद्रीय शेतीला प्रोत्साहन देण्यासाठी सरकारने उचललेल्या पावलांबद्दल, तसंच याबाबत जागरुकता निर्माण करण्यात कृषी विज्ञान केंद्रांनी बजावलेल्या भूमिकेबद्दल समाधान व्यक्त केलं.

****

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा राज्यस्तरीय कार्यक्रम १७ ऑगस्टला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत पुण्यात होणार आहे. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यावेळी उपस्थित असतील. १४ ऑगस्ट अखेरपर्यंत मंजूर होवून शासनास सादर झालेल्या महिलांच्या खात्यात योजनेचे पैसे जमा होणार आहेत. या कार्यक्रमाचं थेट प्रक्षेपण प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी होणार असून, प्रत्येक जिल्ह्यात पालकमंत्र्यांच्या उपस्थितीत महिला मेळावाही होणार आहे. यानंतर प्राप्त अर्जांची कार्यवाही पुढे चालू राहणार असून, योजना कायमस्वरूपी सुरु राहणार असल्याचं याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे.

****

राज्य शासनानं मागील वर्षीच्या सोयाबीन आणि कापूस उत्पादक शेतकऱ्यांना प्रतिहेक्टरी पाच हजार रुपये प्रमाणे, दोन हेक्टर पर्यंत मदत देण्याचा निर्णय घेतला आहे. कृषीमंत्री धनंजय मुंडे यांनी ही माहिती दिली. गेल्या वर्षी खरीप हंगामात कापूस आणि सोयाबीनचे कमी दर मिळाल्यामुळे शेतकऱ्यांना झालेल्या आर्थिक नुकसानीवर उपाययोजना म्हणून हा निर्णय घेण्यात आला असून, ई-पीक पेऱ्यांची नोंदणी केलेल्या सर्व सोयाबीन आणि कापूस उत्पादक शेतकऱ्यांच्या खात्यांवर ही रक्कम जमा करण्यात येणार आहे. यासाठी शेतकऱ्यांनी वैयक्तिक संमतीपत्र किंवा सामूहिक नाहरकत प्रमाणपत्र तातडीने सादर करावे, असंही आवाहन मुंडे यांनी केलं आहे.

****

अहमदनगर जिल्ह्यात राहाता कृषी उत्पन्न बाजार समितीत अत्याधुनिक कोल्ड स्टोरेजसाठी ११ कोटी रूपये मंजूर करण्यात येत असल्याची घोषणा राज्याचे पणन, अल्पसंख्याक विकासमंत्री अब्दुल सत्तार यांनी केली. साकुरी- राहाता कृषी उत्पन्न बाजार समितीच्या मुख्य आवारातल्या विविध विकासकामांचं भूमिपूजन आज सत्तार

यांच्या हस्ते करण्यात आलं, त्यावेळी ते बोलत होते. याठिकाणी शेतकरी भवनासाठी दीड कोटी रुपये मंजूर करण्यात येतील, असंही त्यांनी सांगितलं.

****

विरोधकांनी खोट्या, नकारात्मक बातम्या पसरवल्यामुळे लोकसभेच्या जागा कमी आल्या असल्याचं मत, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केलं. ते आज अकोला इथं भाजपच्या जिल्हा विस्तारित कार्यकारणी बैठकीत बोलत होते. आपल्या जागा कमी आल्या असल्या तरी, आपला जनाधार कमी झालेला नाही असही ते म्हणाले. लाडकी बहीण योजनेसंदर्भातही विरोधी पक्षनेते खोटे बोलत असल्याचं सांगत, कार्यकर्त्यांनी लाडक्या बहिणीच्या संपर्कात राहून त्याचे लाडके भाऊ कोण आहेत हे दाखवून द्यायला पाहिजे असंही ते म्हणाले. शेतकऱ्यांना पुढच्या पाच वर्षांत मोफत वीज देण्याची तयारी करत असल्याचं फडणवीस यांनी सांगितलं.

****

राष्ट्रीय पात्रता प्रवेश परीक्षा – नीट पीजी २०२४ आज घेण्यात आली. नॅशनल मेडिकल सायन्सेस एक्झामिनेशन बोर्डने दोन वेगवेगळ्या वेळांमध्ये संगणकावर आधारित ही परीक्षा घेतली. या प्रवेश परीक्षेला दोन लाखांहून अधिक विद्यार्थी बसले होते. याआधी ही परीक्षा जून महिन्यात घेण्यात येणार होती मात्र स्पर्धा परीक्षांवर झालेल्या आरोपांमुळे एक दिवस आधी ही परीक्षा पुढे ढकलण्याचा निर्णय घेण्यात आला होता.

****

हिंडेनबर्ग रिसर्चनं केलेल्या सर्व आरोपांचं सेबीच्या अध्यक्ष माधवी पुरी बुच आणि त्यांचे पती धवल बुच यांनी खंडन केलं आहे. यासंदर्भात एक निवेदन त्यांनी प्रसिद्ध केलं. कथित आर्थिक गैरव्यवहारात अदानी समूहानं वापरलेल्या ऑफशोअर निधीमध्ये सेबी अध्यक्ष आणि त्यांच्या पतीची भागिदारी असल्याचा आरोप हिंडेनबर्ग रिसर्चनं काल आपल्या संकेतस्थळावर प्रसिद्ध केलेल्या अहवालात केला आहे. मात्र हे आरोप निराधार आणि असत्य असल्याचं माधवी पुरी बुच यांनी म्हटलं आहे. आपले सर्व वित्तीय व्यवहार पारदर्शक असून सेबीकडेही याविषयी सर्व माहिती असल्याचं त्यांनी स्पष्ट केलं आहे.

****

माजी परराष्ट्र मंत्री के. नटवर सिंह यांचं काल रात्री दिल्लीजवळच्या गुरुग्राममध्ये दीर्घ आजारानं निधन झालं. ते ९३ वर्षांचे होते. नटवर सिंह यांना १९८४ मध्ये पद्मभूषण पुरस्कारानं सन्मानित केलं होतं. त्यांनी अनेक पुस्तकंही लिहिली आहेत.

****

पॅरिस ऑलिम्पिक स्पर्धेचा आज समारोप होत आहे. भारतीय वेळेनुसार रात्री साडेबारा वाजता हा सोहळा होईल. भारतातर्फे हॉकीपटू पी. आर. श्रीजेश आणि नेमबाज मनु भाकर या सोहळ्यात प्रमुख ध्वजवाहक असतील. या स्पर्धेत भारत एका रौप्य आणि पाच कांस्य पदकांसह ७१ व्या स्थानावर आहे. यामध्ये भालाफेकपटू निरज चोप्रा याने रौप्य पदक, पिस्तुल नेमबाजीत मनु भाकरने कास्यपदकं, सांघिक नेमबाजी प्रकारात सरबज्योत सिंग आणि मनु भाकर, कुस्तीमध्ये अमन सेहरावत, तर रायफल नेमबाजीत महाराष्ट्राच्या स्वप्निल कुसाळेनं आणि हॉकी संघानं मिळवलेल्या कास्य पदकांचा समावेश आहे.

चीन पहिल्या, अमेरिका दुसऱ्या तर ऑस्ट्रेलिया तिसऱ्या स्थानावर आहे. समारोपाच्या वेळी ऑलिम्पिक ज्योत समारंभपूर्वक शांत केली जाईल आणि पुढच्या, २०२८ ऑलिम्पिकच्या लॉस अँजेलिस व्यवस्थापन समितीकडे ऑलिम्पिकचा ध्वज सुपूर्द केला जाईल.

दरम्यान, भारतासाठी पहिलं वैयक्तिक सुवर्णपदक जिंकणाऱ्या नेमबाज अभिनव बिंद्रा यांना ऑलम्पिक ऑर्डर पुरस्कारानं सन्मानित करण्यात आलं.

****

पनवेल महानगरपालिकेच्या वतीनं आज `घरोघरी तिरंगा` या उपक्रमांतर्गत `तिरंगा मॅरेथॉन` काढण्यात आली. महापालिका मुख्यालय ते वडाळे तलाव पर्यंत ही तिरंगा मॅरेथॉन घेण्यात आली. यात चारशेहून अधिक विद्यार्थी, नागरिक, महानगरपालिका अधिकारी, कर्मचारी, सुरक्षा विभाग आणि स्वच्छतादूत यांनी सहभाग घेतला.

****

मुंबई जिल्हा एड्स नियंत्रण संस्थेमार्फत आज रेड रन मॅरेथॉन स्पर्धा घेण्यात आली. महाविद्यालयीन युवकांमध्ये जनजागृती करण्यासाठी ‘रन टु एन्ड एड्स’ या संकल्पनेअंतर्गत ही स्पर्धा घेण्यात आली. एड्स जनजागृतीच्या राष्ट्रीय कार्यक्रमांतर्गत गर्दीच्या ठिकाणी पथनाट्य, समाजमाध्यमे, बस थांबे, लोकल, रहिवासी संकुले याठिकाणी जाहिराती, एलईडी स्क्रीन, जिंगल यासारख्या संवाद माध्यमांचा वापर करण्यात येत आहे.

****

सांगलीत जिल्ह्यात विविध आपत्ती संदर्भात जनजागृती करण्यासाठी आज जिल्हा प्रशासन आणि मुंबईच्या चौरंग संस्थेच्या सहाय्यानं मॅरेथॉन स्पर्धा घेण्यात आली. विश्रामबाग इथल्या क्रांतिसिंह नाना पाटील चौक इथून या स्पर्धेला सुरूवात झाली. या स्पर्धेत विविध शाळा महाविद्यालयातील राष्ट्रीय छात्र सेनेचे विद्यार्थी, स्वयंसेवी संस्था, आयुषी हेल्पलाईन, रॉयल बोट क्लब सदस्य, एनडीआरएफचे जवान सहभागी झाले होते.

****

केंद्र सरकारच्या सफाई अपनाओ, बिमारी भगाओ या अभियानांतर्गत नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रात पाणी तपासणीची विशेष मोहीम घेण्यात आली. आज तुर्भे इथल्या मलप्रक्रिया केंद्रातल्या प्रयोगशाळेत ही तपासणी करण्यात आली. यात वेगवेगळ्या ठिकाणाहून दोन हजारपेक्षा अधिक पाणी नमुने तपासण्यात आले. पाण्याची गुणवत्ता लक्षात घेऊन त्यानुसार आवश्यक सुधारणा करणं शक्य होत असल्याची माहिती अतिरिक्त शहर अभियंता अरविंद शिंदे यांनी दिली.

****

बीड जिल्ह्यात परळी वैजनाथ जवळ मलकापूर शिवारात झालेल्या भीषण दुर्घटनेत २२ मेंढ्या, दोन गुरे आणि एका मेंढपाळाचा मृत्यू झाला. आज सकाळच्या सुमारास मधुकर सरवदे आणि मुंजा डोणे हे दोघे मेंढ्या चारण्यासाठी परळी-हैद्राबाद रेल्वे पटरीच्या कडेनं जात असताना समोरुन आलेल्या मालगाडीने जनावरांना चिरडले. दोन्ही बाजुने डोंगर असल्यामुळे जनावरांसह मेंढपाळ मुंजा डोणे यांचा या दुर्घटनेत मृत्यू झाला.

****

आषाढी एकादशीचा सोहळा आटोपून संत श्री गजानन महाराजांची पालखी आज शेगावला पोहोचली. या पालखीनं तब्बल ६१ दिवसाचा पायी प्रवास केला. खामगावपासून शेगाव पर्यंत पायी चालणाऱ्या लाखो भक्त गणांच्या आरोग्य सुविधेसाठी लासुरा फाटा इथं वैद्यकीय सेवा आणि मदत कक्ष उभारण्यात आला होता. केंद्रीय आरोग्य राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी या कक्षेला भेट देऊन वारकऱ्यांशी संवाद साधला.

****

यंदा झालेल्या मुसळधार पावसामुळे बीड जिल्हाच्या परळी तालुक्यातल्या नागापूर इथलं वाण धरण पूर्ण भरलं आहे. यामुळे परळी सह १५ गावांचा पाण्याचा प्रश्न मिटला आहे.

****